# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 March 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- कर्करोगाशी लढताना समग्र दृष्टिकोनाची आवश्यकता राज्यपाल रमेश बैस यांच्याकडून व्यक्त
- कोयना धरणाच्या शिव सागर जलाशयात जल पर्यटन केंद्राचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ
- लातूर जिल्ह्यात औसा इथं भरधाव कार उपाहारगृहात घुसल्याने दोन जण ठार

आणि

- धरमशाला कसोटीत भारताचा एक डाव आणि ६४ धावांनी विजय

****

कर्करोगाशी लढताना समग्र दृष्टिकोनाची आवश्यकता राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली आहे. आज मुंबईत 'पहिले माझे कर्तव्य' फाउंडेशनच्या आय इन्स्पायर पुरस्कार प्रदान सोहळ्यात राज्यपाल बोलत होते. कर्करुग्ण तसंच त्यांच्या कुटुंबांना मदत करणाऱ्या वैद्यकीय तसंच बिगर वैद्यकीय क्षेत्रातल्या सेवाभावी व्यक्तींना राज्यपाल बैस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. तीन जणांना जीवन गौरव सन्मान तर कॅन्सरवर मात करणाऱ्या महिला तसंच विविध क्षेत्रातल्या २० कर्करोग योद्ध्यांना 'आय इन्स्पायर पुरस्कार' देण्यात आले. कर्करोगाचं निदान वेळेवर झाल्यास उत्तम उपचार करता येतात, असं सांगत, कर्करुग्णांच्या तसंच त्यांच्या कुटुंबियांच्या मानसिक, भावनिक आणि आर्थिक समस्यांचा विचार झाला पाहिजे, असं मत राज्यपालांनी व्यक्त केलं.

****

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी मुंबईतल्या साकी नाका इथं बहुउद्देशीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन केंद्राची पायाभरणी आणि पुणे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि सुविधा कार्यालयाचं आज उद्घाटन केलं. मंत्री राणे यांनी बहुउद्देशीय प्रदर्शनाला भेट देऊन उद्योगाविषयी चर्चा केली. तसंच त्यांच्या हस्ते उद्योजकांचा सत्कारही करण्यात आला. प्रधानमंत्री विश्वकर्मा, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सी.ओ.आय.आर. बोर्डाच्या उत्पादनांची १०० पेक्षा जास्त दालनं आहेत. कार्यक्रमादरम्यान पीएम विश्वकर्मा कार्यशाळेचंही आयोजन करण्यात आलं आहे.

****

सातारा जिल्ह्यातील मौजे दरे इथल्या बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार आणि वनसंवर्धन प्रकल्पाचं लोकार्पण तसंच गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना बांबू लागवडीस आणि रेशीम उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. यातून शेतकरी, तसंच महिला आणि युवकांना कृषी आणि वनउपज उत्पादनासाठी पूरक रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. जंगल भागातील शेतकरी महिला आणि युवकांना टरस रेशीम शेती नाविन्यपूर्ण शाश्वत उद्योग आहे. सह्याद्रीपर्वत रांगांमधील शेतकऱ्यांसाठी वन्य रेशीम शेती एक वरदान ठरणार आहे असा विश्वासही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

****

कोयना जल पर्यटन केंद्र हे देशातील गोड्या पाण्यातील सर्वात मोठे जल पर्यटन केंद्र असून, यातून पर्यावरण पूरक विकास आणि स्थानिकांना रोजगार या बाबींना प्राधान्य देण्यात येणार असल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. सातारा जिल्ह्यातल्या मुनावळे इथं कोयना धरणाच्या शिव सागर जलाशयात पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जल पर्यटन केंद्राचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. मासेमारी, बोटिंग, जल पर्यटन यासाठी या बाबींचा फायदा होणार आहे. मात्र विकास करत असताना तो कोणत्याही परिस्थितीत पर्यावरण पूरक असला पाहिजे, अशा सूचना पर्यटन विभागाला त्यांनी यावेळी केल्या.

****

देशातील सर्वात सुंदर आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी युक्त असा दिव्यांग पार्क नागपूर शहरात होत असून याचा फायदा दिव्यांगांना होणार असल्याचा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. नागपूर इथं दिव्यांगाकरिता अनुभुती इन्क्लुझिव्ह पार्कचा लोकार्पण सोहळा आज मंत्री गडकरींच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. मध्य प्रदेशातल्या उज्जैन इथल्या दिव्यांग पार्कच्या धर्तीवर उभारल्या गेलेल्या या पार्कमध्ये फिजिओथेरपी इमारत, हायड्रोथेरपी रूम,वर्ग, वॉटर इक्विटी झोन, किचन कॅन्टीन, दृष्टीहीन लोकांसाठी स्पर्शिकामार्ग, श्रवणदोष असलेल्यांसाठी सांकेतिक भाषा निर्देशक आणि ब्रेल लिपी मधील नामांकन आणि चिन्ह यांचा समावेश आहे. दिव्यांगासाठी नागपुरात सर्वात मोठं क्रीडांगण उभारलं जाणार असल्याचंही गडकरींनी यावेळी जाहीर केलं.

****

लोकसभेच्या जागावाटपाचं भाजपचं ऐंशी टक्के काम झालं असून चर्चा करून लवकरच सर्व जागावाटप जाहीर करणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. ते आज नागपूर इथं एका कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कंत्राटी कामगारांबद्दल सरकार संवेदनशील असून त्यांना आर्थिक विमा, आरोग्य विमा मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच कंत्राटी कर्मचारी यांना नियमित भरतीत उद्भवणाऱ्या समस्या, वयाची अट आणि निकालातील गुणदान यावर सुद्धा सखोल चर्चा झाली असल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

****

धुळे जिल्ह्यात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील भारत जोडो न्याय यात्रेचे जल्लोषात स्वागत करणार असल्याचा निर्धार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील यांनी आज धुळ्यात यासंदर्भातल्या बैठकीनंतर ही माहिती दिली. येत्या १२ मार्च रोजी या यात्रेचं धुळे जिल्ह्यात तर येत्या १३ मार्च रोजी धुळे शहरात आगमन होणार आहे.

****

मतदान जनजागृती अभियान आज धुळे तालुक्यातल्या निमगुळ गावात राबवण्यात आलं. शालेय विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीच्या घोषणा देत गावातून रॅली काढली. तसंच ग्रामपंचायत समोर गावातल्या नागरिकांना एकत्र करुन मतदान प्रतिज्ञा ही घेण्यात आली.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १२ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन अॅट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

जालना मुंबईत जनशताब्दी एक्सप्रेस आता उद्यापासून हिंगोली वरून सुटणार आहे. आज दुपारी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी हिंगोली रेल्वे स्थानकावर हिरवा झेंडा दाखवून या गाडीचा शुभारंभ केला. याप्रसंगी हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील, आमदार तानाजी मुटकुळे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्या १० मार्चपासून ही एक्स्प्रेस हिंगोली इथून पहाटे चार वाजून २० मिनिटांनी सुटणार आहे. जालन्याला ही गाडी सकाळी नऊ वाजता, छत्रपती संभाजीनगरला नऊ वाजून ५० मिनिटांनी तर मुंबईला दुपारी चार वाजून ५० मिनिटांनी पोहोचेल. मुंबईहून ही गाडी दुपारी बारा वाजून दहा मिनिटांनी सुटणार असून, छत्रपती संभाजीनगरला संध्याकाळी सहा वाजून २५ मिनिटांनी, जालना इथं संध्याकाळी सात वाजून ४५ मिनिटांनी, तर हिंगोली इथं रात्री साडे बारा वाजता पोहोचेल.

****

लातूर जिल्ह्यात औसा इथं भरधाव कार एका उपाहारगृहात घुसल्याने झालेल्या अपघातात दोन जण ठार तर एक जण जखमी झाला. लातूर–औसा महामार्गावर औसा शहराजवळील सीएनजी पेट्रोलपंपाजवळ आज सकाळी हा अपघात झाला. वाजिद खान चांद खान पठाण आणि शेख सोहेल गफार अशी मृतांची नावं असून ओंकार कांबळे हा १४ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला आहे. औशाहून लातूरकडं भरधाव जाणारी चारचाकी रस्ता सोडून एका उपाहारगृहाच्या दर्शनी

भागात आदळल्यानं हा अपघात झाला. याप्रकरणी औसा पोलिस अधिक तपास करीत आहेत.

****

धरमशाला इथं झालेला पाचवा आणि अंतिम क्रिकेट कसोटी सामना एक डाव आणि ६४ धावांनी जिंकत भारताने ५ कसोटी सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकली. भारताने आज आपला पहिला डाव कालच्या आठ बाद ४७३ धावांवरून पुढे सुरू केला. मात्र अवघ्या चार धावांत भारताचे दोन फलंदाज बाद झाले. आणि भारताने एकूण २५९ धावांची आघाडी घेतली होती. इंग्लंडचा दुसरा डाव ४९ व्या षटकांत १९५ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून जो रूटनं सर्वाधिक ८४ धावा केल्या. भारताकडून रविचंद्रन अश्विननं सर्वाधिक पाच, जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादवनं प्रत्येकी दोन तर रविंद्र जडेजानं एक बळी घेतला. कुलदीप यादव सामनावीर तर यशस्वी जयस्वाल मालिकावीर पुरस्काराचे मानकरी ठरले.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सुदर्शन रापतवार यांची निवड करण्यात आली आहे. शाखेचे सचिव गोरख शेंद्रे यांनी ही माहिती दिली

****

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे येत्या १२ आणि १३ मार्च रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यात विविध ठिकाणी मराठा बांधवांसोबत ते संवाद बैठक घेणार आहे. मराठा आरक्षणासाठीची पुढील दिशा ठरविण्यासाठी संवाद साधणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाच्या वतीनं घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

****